**प्रकल्प प्रवर्तक मे. मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ६२, ६५, ६६, ७४, ७९, ८०, ८१, ८३, १०४, १०५, ११३, ११४, ११५, ११६, ११८, १५५,१५७ (सर्व्हे नं.९५ व ९७), मुक्काम पोस्ट-मंगरुळ, तालुका-तुळजापूर, जिल्हा-धाराशीव (पीन - ४१३ ६१६), महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित मोलॅसिस आधारित आसवणी प्रकल्प विस्तारिकरण ४५.० किलोलिटर प्रतिदिनपासून १५५.० किलोलिटर प्रतिदिनपर्यंत (११०.० किलोलिटर प्रतिदिन वाढ) मोलॅसिस ('सी' आणि 'बी' हेवी मोलॅसिस)/केन ज्युस/केन सिरप/धान्यावर आधारित विस्तारिकरणासोबत ६.० मे. वॅट सह वीज निर्मिती प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ६२, ६५, ६६, ७४, ७९, ८०, ८१, ८३, १०४, १०५, ११३, ११४, ११५, ११६, ११८, १५५,१५७ (सर्व्हे नं.९५ व ९७), मुक्काम पोस्ट-मंगरुळ, तालुका-तुळजापूर, जिल्हा-धाराशीव (पीन - ४१३ ६१६), महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित मोलॅसिस आधारित आसवणी प्रकल्प विस्तारिकरण ४५.० किलोलिटर

प्रतिदिनपासून १५५.० किलोलिटर प्रतिदिनपर्यंत (११०.० किलोलिटर प्रतिदिन वाढ) मोलॅसिस ('सी' आणि 'बी' हेवी मोलॅसिस)/केन ज्युस/केन सिरप/धान्यावर आधारित विस्तारिकरणासोबत ६.० मे.वॅट वीज निर्मिती प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १२ जून, २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थळ - मे. मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ६२, ६५, ६६, ७४, ७९, ८०, ८१, ८३, १०४, १०५, ११३, ११४, ११५, ११६, ११८, १५५,१५७ (सर्व्हे नं.९५ व ९७), मुक्काम पोस्ट-मंगरुळ, तालुका-तुळजापूर, जिल्हा-धाराशीव (पीन - ४१३ ६१६), महाराष्ट्र राज्य येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. परमेश्वर नाईक, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री ओंकार बाळासाहेब देशमुख, उप जिल्हाधिकारी, धाराशिव तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री मनिष होळकर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा सदस्य,

पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे संभाव्य पर्यावरणीय परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून

घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की **प्रकल्प प्रवर्तक मे. मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड** यांचा त्यांच्या **गट नं. ६२, ६५, ६६, ७४, ७९, ८०, ८१, ८३, १०४, १०५, ११३, ११४, ११५, ११६, ११८, १५५,१५७ (सर्व्हे नं.९५ व ९७), मुक्काम पोस्ट-मंगरुळ, तालुका-तुळजापूर, जिल्हा-धाराशीव (पीन - ४१३ ६१६), महाराष्ट्र राज्य** येथील कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित मोलॅसिस आधारित आसवणी प्रकल्प विस्तारिकरण ४५.० किलोलिटर प्रतिदिनपासून १५५.० किलोलिटर प्रतिदिनपर्यत (११०.० किलोलिटर प्रतिदिन वाढ) मोलॅसिस ('सी' आणि 'बी' हेवी मोलॅसिस)/केन ज्युस/केन सिरप/धान्यावर आधारित विस्तारिकरणासोबत ६.० मे.वॅट वीज निर्मिती प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित

करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास रितसर अर्ज दिनांक २८-०२-२०२६ रोजी सादर केला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार **संवर्ग ए - सह विज निर्मीती प्रकल्प आणि आसवणी - ५ (जी) अंर्तगत मोडत** असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०८-१०-२०२५ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक १५-१०-२०२५ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त

करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ऑक्टोबर, २०२४ ते डिसेंबर, २०२४ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

सहसंचालक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक ०४.०३.२०२६ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांनी पत्र दिनांक २२.०४.२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी, धाराशिव यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी त्यांच्या पत्र दिनांक २२.०४.२०२६ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १२ जून, २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थळ -प्रकल्प प्रवर्तक मे. मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ६२, ६५, ६६, ७४, ७९, ८०, ८१, ८३, १०४, १०५, ११३, ११४, ११५, ११६, ११८, १५५,१५७ (सर्व्हे नं.९५ व ९७), मुक्काम पोस्ट-मंगरुळ, तालुका-तुळजापूर, जिल्हा-धाराशीव (पीन - ४१३ ६१६), महाराष्ट्र राज्य येथे आयोजित करण्यास मान्यता दिली.

मा. जिल्हाधिकारी,धाराशिव यांनी दिलेल्या मान्यतेनुसार मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश दिनांक २६-०५-२०२६ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी,धाराशिव, - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(उप विभागीय दंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

**२)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी -
प्रादेशिक अधिकारी-छत्रपती संभाजीनगर,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर,

३) उप प्रादेशिक अधिकारी **-समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
लातूर

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०८-०५-२०२६ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड, धाराशिव,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, धाराशिव,

५) उप विभागीय अधिकारी,तुळजापूर,जिल्हा-धाराशिव

६) तहसील कार्यालय,तुळजापूर,तालुका,जिल्हा-धाराशिव

७) ग्रामपंचायत कार्यालय-मंगरुळ, भातंब्री, रायखेल, धनेगाव (तुळजापूर), कुंभारी (तुळजापूर), यमगरवाडी,कदमवाडी, सरडेवाडी, नांदुरी, खंडाळकरवाडी, खोताचीवाडी, आरळी बुद्रुक, चिंचोली, काळेगाव (तुळजापूर), कसई, चव्हाणवाडी (तुळजापूर), तालुका-तुळजापूर, जिल्हा-धाराशिव,

८) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

९) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१०) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, दैनिक लोकपत्रच्या मागे, सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल शेजारी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर -

११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,भूखंड क्रं. पी-१०, लातूर जिल्हा उद्योग समूह इमारत, एम.आय.डी.सी. लातूर - ४१३ ५३१

१२) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई - मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांना ०४ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले. उपस्थितांना लेखी सूचना सादर करावयाच्या असल्यास ते बैठकीत म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीस सादर करु शकतात.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, प्रकल्प नाकारणे किंवा प्रकल्पाची शिफारस करण्याचा

अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, बैठकीचे इतिवृत (मराठी व इंग्रजी) , प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याची सूचना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की देशाच्या आर्थिक उन्नतीमध्ये

अल्कोहोल निर्मितील महत्वाचे स्थान आहे. पेट्रोलबरोबर ब्लेंडींगसाठी पॉवर अल्कोहोलच्या रुपात इंधन म्हणून वापर करण्यात येतो. भविष्यातील अल्कोहोल मागणीचा विचार करुन व्यवस्थापनाने कारखान्याच्या आसवणी प्रकल्पाचा विस्तारीकरणाचा निर्णय घेतलेला आहे.

प्रस्तावित प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण म्हणजे झेडएलडी प्रकल्प आहे. प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. प्रकल्पात सी.पी.यु. (CPU – Condensate Polishing Unit) कार्यान्वित करण्यात येणार असून त्यांमुळे सांडपाण्याचा १००%पुनर्वापर होणार आहे.

प्रकल्पात पर्यावरण संरक्षणासाठी ₹ ३३.३० कोटींची तरतुद केलेली असून परिसरातील सामाजिक व आर्थिक विकासासाठी ₹१.५० कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी कार्यरत प्रकल्प व प्रस्तावित आसवणी प्रकल्प विस्तारीकरणाबाबत आणि प्रस्तावित

प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेची (ईएमपी) सविस्तर माहिती बैठकीत दिली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पापासून हरणी नदी ही ३.० कि.मी. अंतरावर आहे, तर आरक्षित जंगल हे २.१ कि.मी. अंतरावर आहे. त्याबाबत वनविभागाचे ना हरकत प्रमाणपत्र प्रकल्प प्रवर्तकांना प्राप्त झालेले आहे.

प्रस्तावित प्रकल्पासाठी एकूण गुंतवणूक ही १७५.० कोटी आहे.

त्यांनी सांगितले की प्रकल्प विस्तारिकरणामुळे आसवणी प्रकल्पात अतिरिक्त ८० मनुष्यबळाची गरज असून ती परिसरातील युवक युवतींना संधि देऊन पूर्ण करण्यात येईल.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात ३३% हरितपट्टा विकसित करणे बंधनकारक आहे. प्रकल्पाची जागा ३२.० हेक्टर आहे. त्यामुळे प्रकल्पात १०.५४ हेक्टर जागा ही हरितपट्टा म्हणून विकसित करावी लागेल. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांनुसार ज्या प्रजाती लावणे बंधनकारक आहेत,

त्यांचीच लागवड करण्यात येईल. सध्या प्रकल्पात झाडांची संख्या २१,३०० असून प्रस्तावित ५,०५० झाडे ही लावण्यात येतील.

प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापन भांडवली गुंतवणूक ३,३०० लाख तर प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेसाठी वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी २०० लाख गुंतवणूक करण्यात येणार आहे.

सदरहू प्रकल्प हा मंगरुळ गावासाठी, महाराष्ट्र राज्यासाठी तसेच देशासाठी अत्यंत फायद्याचा आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रश्न उपस्थित करताना आपले संपूर्ण नांव व गावाचे नाव सांगण्यात यावे. त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री श्रीकिशन सुरवसे, राहणार-मंगरूळ,तालुका-तुळजापूर,जिल्हा-धाराशिवः-**

प्रस्तावित आसवणी विस्तारिकरण प्रकल्पात उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणा-या दुर्गंधीवर नियंत्रण करण्यासाठी काय उपाययोजना अंगिकारण्यात येणार आहेत?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पूर्वीच्या काळी साखर कारखाना प्रकल्पात कंपोस्टींग करण्यात यायचे, म्हणजे खत निर्मिती करण्यात येत असे. आसवणी प्रकल्पात जो स्पेंट वॉश उत्पन्न होतो, तो प्रेस मडवर फवारला जायचा व कंपोस्टींग करण्यात यायचे. त्यासाठी ४५ दिवसांचे सायकल/चक्र पाळावे लागे. त्यामुळे दुर्गंधी व माशा पसरत असत.

मात्र आता तसे होणार नाही. प्रस्तावित आसवणी विस्तारिकरण प्रकल्पात इन्सिनरेशन करण्यात येणार आहे. स्पेंट वॉश उत्पन्न झाल्यावर तो concentration साठी पाठविण्यात येईल. नंतर त्याचे इन्सिनरेशन करण्यात येईल म्हणजे स्पेंट वॉश हा

जाळण्यात येणार आहे. स्पेंट वॉशची साठवण करण्यात येणार नाही. त्यामुळे परिसरातील लोकांना दुर्गंधीचा त्रास होणार नाही.

तसेच प्रस्तावित आसवणी विस्तारिकरण प्रकल्पात स्पेंट वॉश सुकवून (dry) त्याचे रुपांतर पावडर स्वरुपात करणार आहोत. त्यामुळे bio-methenization, concentration and drying करणार आहोत. येथे स्पेंट वॉशची साठवण करण्यात येणार नाही त्यामुळे दुर्गंधीचा त्रास होणार नाही.

२) **<u>श्री गफर शेख, राहणार-मंगरूळ,तालुका-तुळजापूर,जिल्हा-धाराशिवः-</u>**

प्रस्तावित आसवणी प्रकल्पात प्रति दिन किती उत्पादन होणार आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की कार्यरत आसवणी प्रकल्पात ४५.० किलोलिटर प्रतिदिन रेक्टिफाईड स्पिरिट व इथेनॉल निर्मिती करण्यात येत आहे. प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात १५५.० किलोलिटर प्रतिदिन पर्यंत रेक्टिफाईड स्पिरिट (आर.एस.), एक्सट्रा न्युट्रल अल्कोहोल (ईएनए) व इथेऩॉल यांचे मुख्यतः

उत्पादन घेण्यात येईल. १५५.० किलो लिटर प्रतिदिन उत्पादनाची मर्यादा पाळण्यात येणार आहे. त्यानुसारच प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात उत्पादन यंत्रणा ही कार्यान्वित करण्यात येणार आहे.

**३) श्री भारत भगवान क्षिरसागर, राहणार-खोताची वाडी,तालुका-तुळजापूर, जिल्हा-धाराशिवः-**

प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाचा सभोवतालच्या गावांना काय फायदा होणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की साखर कारखान्यात जास्त मनुष्यबळाची आवश्यकता असते. सध्या कार्यरत साखर कारखान्यात - ३४३ व्यक्ती तर आसवणी प्रकल्पात - ३९ व्यक्ती असे एकूण ३८२ व्यक्ती कार्यरत आहेत. तसेच प्रकल्पातील हरितपट्टा संवर्धनासाठी, कॅन्टीनमध्ये स्थानिक लोक काम करत आहेत. म्हणजे अप्रत्यक्ष रोजगारात वाढ झालेली आहे. कार्यरत प्रकल्पात जे टँकर्स, गाडया वापरात आहेत, त्या स्थानिकांकडूनच घेण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे अप्रत्यक्ष व्यवसायात वाढच झालेली आहे.

प्रस्तावित आसवणी विस्तारिकरण प्रकल्पात अतिरिक्त ८० मनुष्यबळाची आवश्यकता असून त्यासाठी स्थानिकांनाच रोजगाराची संधि देण्यात येईल.

मात्र प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पामुळे स्थानीक परिसरात औद्योगिक विकासात, रोजगार निर्मितीत चालना/प्रत्यक्ष फायदा (direct benefit) होणार असून येथील अप्रत्यक्ष व्यवसायात (indirect business) प्रचंड प्रमाणात वाढ होणार आहे. म्हणजे विस्तारिकरण प्रकल्पासाठी अतिरिक्त टॅंकर्स, गाड्या लागतील. त्यासाठी स्थानिकांचे टॅंकर्स, गाड्या घेण्यात येतील. प्रकल्पात कुशल व अकुशल कामगारांची गरज लागणार असून त्यात स्थानिक़ांनाच संधि देण्यात येईल.

तसेच विस्तारिकरण प्रकल्पामुळे सीईआर उपक्रमांसाठी १.५० कोटींची तरतुद करण्यात आलेली असून स्थानिक ग्रामपंचायतीने सूचविलेले सामाजिक व पर्यावरणीय कार्यक्रम राबविण्यात येतील. याचा फायदा स्थानिक लोकांनाच होणार आहे.

**४) श्री राजन भोकरे, राहणार-नांदुरी, तालुका-तुळजापूर,जिल्हा-धाराशिवः-**

प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणामुळे जे अतिरिक्त पाणी होणार आहे, त्यासाठी कारखान्याने काय पर्यायी व्यवस्था केलेली आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी श्री भोकरे यांना अतिरिक्त पाणी म्हणजे कन्डेसेटबाबत माहिती आवश्यक आहे का याबाबत विचारणा केली. श्री भोकरे यांनी जास्त झालेल्या पाण्याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की साखर कारखान्यात ऊसाचे गाळप झाल्यानंतर जो रस/ज्युस निघतो, त्यातून साखर काढण्यासाठी तो आटवावा लागतो. त्यावेळी जे पाणी बाहेर पडते, त्यास कन्डेनसेट असे म्हणतात. ते कन्डेन्सेट साखर प्रकल्पातच प्रक्रियेसाठी तसेच झाडांसाठी वापरण्यात येते. तसेच साखर प्रकल्पातील अतिरिक्त पाणी कार्यरत आसवणी प्रकल्पातही वापरण्यात येते. भविष्यात साखर कारखाना विस्तारिकरण करताना जे अतिरिक्त कन्डेन्सेट तयार होईल, तेसुध्दा आसवणी

प्रकल्पातच वापरण्यात येईल. त्यामुळे आसवणी प्रकल्पातील ताज्या पाण्याची गरज ही कमी होणारच आहे.

५) **श्री नागनाथ बचाटे, राहणार-आरळी बुद्रुक, तालुका-तुळजापूर, जिल्हा-धाराशिवः-**

प्रस्तावित आसवणी विस्तारिकरण प्रकल्पासाठी नविन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार आहे काय? जर करणार असाल, तर त्यापासून होणा-या प्रदूषण नियंत्रणासाठी काय उपाययोजना करण्यात येतील?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की उत्पादन वाढल्यामुळे डिस्टीलेशन कॉलम वाढणार, डिस्टीलेशन कॉलम वाढल्यामुळे अतिरिक्त वाफ (steam) लागणार आहे, त्यासाठी नविन बॉयलर आवश्यक आहे. त्यासाठी ४०.० टन नविन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यासाठी इंधन म्हणून साखर कारखान्यातील बगॅस वापरण्यात येईल. बॉयलरपासून होणा-या हवा प्रदूषण नियंत्रणासाठी अत्याधुनिक अशी ईएसपी (Electro Static Preciparator) ही संयत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यास

स्टॅक/चिमणी लावण्यात येणार आहे. ईएसपीची कार्यक्षमता ही ९९.९% असते. उत्पादन प्रक्रियेत तयार होणार धुलीकण (Particles) यांचा अटकाव होणार आहे. त्यामुळे शुध्द हवा ही बाहेर फेकली जाईल.

६) **श्री दत्तात्रय भारत जाधव,राहणार-मंगरूळ,तालुका-तुळजापूर,जिल्हा-धाराशिवः-**

प्रस्तावित विस्तारिकरणानंतर आसवणी प्रकल्प हा किती दिवस कार्यान्वित राहणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पूर्वी कंपोस्टींग करण्यात येत असे. त्यामुळे आसवणी प्रकल्प हा पावसाळ्यात बंद ठेवावा लागे, कारण पावसाळ्यात खतनिर्मिती होत नव्हती. त्यामुळे त्यावेळी आसवणी प्रकल्प जास्तीतजास्त २७० दिवस कार्यान्वित रहात असे.

मात्र आता इन्सिनरेशन तंत्रज्ञान अवलंबिण्यात येत आहे. यात स्पेंटवॉश हा जाळण्यात येतो. आत नविन तंत्रज्ञान म्हणजे ड्रायिंग हे आहे. त्यामुळे कारखाना हा संपूर्ण वर्ष कार्यान्वित

राहणार आहे. त्यात एक महिना हा देखभालीसाठी बंद ठेवावा लागतो, तर आसवणी प्रकल्प हा ३३० दिवस कार्यान्वित राहणार आहे.

७) **<u>श्री राम चव्हाण, राहणार-चव्हाणवाडी,तालुका-तुळजापुर,जिल्हा-धाराशिवः-</u>**

प्रस्तावित आसवणी विस्तारिकरण प्रकल्पात हरितपट्टा किती विकसित करण्यात येईल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की एकूण प्रकल्प क्षेत्राच्या ३३% क्षेत्र हे हरितपट्टा विकसित करणे बंधनकारकच आहे. प्रकल्पाची जागा ३२.० हेक्टर आहे. त्यामुळे प्रकल्पात १०.५४ हेक्टर जागा ही हरितपट्टा म्हणून विकसित करावी लागेल. ती जागा कंपाऊट भिंतीच्या भोवती, रस्त्याच्या कडेने आणि जेथे जागा/भूखंड उपलब्ध आहे तेथे मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण (mass plantation) करण्यात येईल. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांनुसार ज्या प्रजाती लावणे बंधनकारक आहेत, त्यांचीच लागवड करण्यात येईल. त्यामुळे प्रकल्पाच्या भोवती एक

हरित संरक्षक कवच (green barrier) तयार होईल. त्यामुळे प्रकल्पातील आवाज हा बाहेर जाणार नाही. स्थानिक प्रजातीतील नीम, वड, पिंपळ, चिंच ही झाडेच लावण्यात येतील, जी येथील वातावरणात बहरतील.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, मत किंवा आक्षेप उपस्थित करावयाचे असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

८) **श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, राज्य-तेलंगणाः-**

प्रकल्प व्यवस्थापन आणि ग्रामस्थ या दोघांनाही माझ्या शुभेच्छा. एक पर्यावरणवादी म्हणून, मी सरकारला या उद्योगास बिनशर्त परवानगी देण्याचे आवाहन करतो.

माझ्या निदर्शनास तीन पर्यावरणीय मुद्दे आले आहेत - जलसंधारण (वॉटर हार्वेस्टिंग) ही एक महत्त्वाची बाब आहे; शक्य असल्यास त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. माझ्या निरीक्षणांनुसार, या भागात २५ ते ३५ कोटी लिटर पाणी उपलब्ध

होते. त्यामुळे, शक्य तितक्या प्रमाणात जलसंधारणाचे काम केले जावे. यामुळे या भागातील भूजल पातळी वाढण्यास मदत होईल आणि त्याचा फायदा संबंधित उद्योगाला तसेच आसपासच्या परिसरालाही होईल.

वृक्षारोपणाबद्दल मी तुमच्या व्यवस्थापनाचे अभिनंदन करतो. हे अतिशय उत्तम काम आहे. तुम्ही फळझाडे आणि औषधी गुणधर्म असलेली झाडे लावली आहेत.

दुसरी बाब म्हणजे कौशल्य विकास. शक्य असल्यास, शासनाच्या मदतीने परिसरातील गावांमध्ये राहणाऱ्या बेरोजगार तरुण-तरुणींसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. याचा उद्योगालाही फायदा होईल. प्रशिक्षित तरुणांना इतरत्रही संधी मिळू शकेल आणि त्यामुळे तुमच्या आस्थापनेची विश्वासार्हता वाढेल.

समन्वय समितीची स्थापना करावी आणि जो काही खर्च येईल तो करावा. मागणी-आधारित कामे परिसरात हाती घेतली जावीत.

यामध्ये दोन पैलू आहेत - एक म्हणजे प्रदूषण आणि दुसरे म्हणजे विकास. भारतात प्रदूषण निर्माण करणारे ६-७ घटक आहेत, त्यापैकी उद्योग हा एक घटक आहे. तुमचे उत्पादन समाजासाठी उपयुक्त असते. भारतात, बहुतेक पर्यावरणवादी प्रदूषणासाठी नेहमीच उद्योगांना दोष देतात.

भारतात रस्त्यांवर अंदाजे ५० कोटी वाहने धावत आहेत. भारतात दरवर्षी ३५ कोटी (लिटर) डिझेल वापरले जाते, जे मोठ्या प्रमाणावरील प्रदूषणाचे एक मुख्य कारण आहे.

भारतात दरवर्षी ६ कोटी टन खतांचा वापर केला जातो आणि हे येथील एक प्रमुख साधन आहे. भारतात दरवर्षी एक कोटी लिटर कीटकनाशकांचा वापर होतो. अन्नात भेसळ केली जाते.

काही पर्यावरणवादी औद्योगिक विकासावर विनाकारण दोषारोप करत आहेत. केवळ दोषारोप केल्याने पर्यावरणविषयक जाहिर सल्लामसलतीच्या प्रक्रियेवर दबाव निर्माण होतो.

त्यामुळे, मी भारत सरकारला आवाहन करतो की काही उद्योगांना सार्वजनिक सल्लामसलतीच्या प्रक्रियेतून वगळण्यात

यावे; अन्यथा, सहा महिन्यांच्या आत त्या उद्योगांना पर्यावरणविषयक मंजुरी (Environment Clearance) देण्यात यावी. बेरोजगारी ही भारतातील एक मोठी समस्या (प्रदूषणासारखीच घातक बाब) आहे. या उद्योगाला बिनशर्त परवानगी देण्यात यावी, अशी मी मागणी करत आहे.

येथे आयोजक यांनी उपस्थितांना फक्त प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप उपस्थित करण्याची सूचना केली.

९) **<u>श्री मनिष होळकर, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>**

RO रिजेक्टचा वापर कूलिंग टॉवरसाठी केला जाणार आहे. कूलिंग टॉवरसाठी याचा वापर करणे योग्य आहे का? त्यासाठी काही प्रक्रिया (treatment) करणे आवश्यक आहे का?

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे पर्यावरण सल्लागार यांना सूचना केली की सादरीकरणात आपण आर.ओ. रिजेक्टचे रिजेक्शन आपण कुलिंग टॉवरला दाखविलेले आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारणा केली की कुलिंग टॉवरला वापरण्यापूर्वी त्याची MEE, ATFD आणि त्याचे कन्डेन्सेट आपण कुलिंग टॉवरला वापरल्यास स्केलिंगमुळे उत्पादनात फरक पडू शकतो का?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कन्डेन्सेटमध्ये जास्त टी.डी.एस. असतो, २,०००-३,००० टीडीएस आढळतो. आर.ओ. रिजेक्ट जसे आहे तसे कुलिंग टॉवरला जाणार नाही. त्यावर प्रथम प्रक्रिया करण्यात येईल.

सदस्य व आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात व सादरीकरणात त्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची सूचना केली.

१०) **<u>श्री चंद्रसेखर, पर्यावरणवादी-एन.जी.ओ.-</u>**

मी या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत प्रकल्पाचे स्वागत करतो. मी काही सूचना करतो-

प्रकल्प परिसरात व आजूबाजूच्या परिसरात हरितपट्टा विकसित करण्यात यावा, प्रकल्प परिसरातील गावांतील लोकांना

रोजगाराची संधी देण्यात यावी, प्रकल्पाचा सीएसआर निधी हा परिसरातील गावांच्या विकासासाठी खर्च करण्यात यावा. तसेच प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणात कामगारांना सुरक्षा उपकरणे उपलब्ध करुन देण्यात यावीत,

मी शासनास या प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्रदान करण्याची विनंती करत आहे.

११) **<u>श्री व्यंकटेश,पर्यावरणवादीः-</u>**

मी पर्यावरण जनसुनावणीत विनंती करतो की प्रकल्पात स्थानिक लोकांना नोकरी देताना शैक्षणिक अहर्ता लक्षात घेऊन आणि कुशल व अर्धकुशल संवर्गात त्याप्रमाणेच रोजगाराची संधि देण्यात यावी. तसेच प्रकल्पात गाड्या, टीपर्स लागताना ते स्थानिकांकडूनच घेण्यात यावे. मी शासनास सदरहू प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्रदान करण्याची विनंती करतो.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना

प्रस्तावित प्रकल्पाबाबत सूचना व बैठकीस मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की बैठकीत काही उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना,विचार,आक्षेप नोंदविलेले असून त्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. मात्र अजूनही कोणाला प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना,विचार,आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते नोंदवू शकतात. जर कोणाला लेखी स्वरुपात नोंदविण्याचे असल्यास तेही नोंदवू शकता हे आयोजकांनी सांगितलेले आहेच. ज्यांना आज शक्य नसेल, तेही लेखी स्वरुपात त्यांच्या सूचना/आक्षेप हे उप विभागीय कार्यालय,धाराशिव येथे सादर करु शकता. त्यांची सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयास सादर करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना केली की प्रकल्प प्रवर्तक पर्यावरणविषयक निर्देशांचे पालन करण्याबरोबरच एक सामाजिक जबाबदारी म्हणून

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधीतून (सीएसआर निधी) परिसरात शैक्षणिक व आरोग्यविषयक योजना प्रकल्प परिसरातील गावांमध्ये राबविण्यात यावेत. बैठकीत काही उपस्थितीतांनी प्रकल्पात विकसित करण्यात आलेल्या हरितपट्टयाबद्दल अतिशय समाधान व्यक्त करुन प्रकल्प व्यवस्थापनाचे अभिनंदन केलेले आहे. अशा कार्याचे निश्चितच शासनाकडूनही स्वागत करण्यात येईल.

आता एल-निनो संदर्भात ब-याच चर्चा होत आहेत. त्याची तीव्रता जास्त आहे. मागच्या वर्षी यावेळेस पावसास सुरवात झालेली होती. १५ जुन जवळ आलेला आहे. अजूनही पावसाचा पत्ता नाही. तरी सीएसआर निधीतून जलसंधारणाची काही कामे प्रकल्प परिसराच्या गावांमध्ये हाती घेता आली, तर प्रकल्पाची पाण्याची गरज व स्थानिक गावांतील पाण्याची गरज भागविणे शक्य आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना किंवा आक्षेप नोंदविण्याचे आहे काय याबाबत विचारणा केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की अजूनही कोणाला लेखी स्वरुपात प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास ते लेखी स्वरुपात उप विभागीय कार्यालय–धाराशीव येथे सादर करु शकता. त्याची पोच देण्यात येईल आणि ते महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर कार्यालयास सादर करण्यात येईल. त्यांनी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती बैठकीची पुढील कार्यवाही करण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जलसंधारण, मृदासंरक्षण, शैक्षणिक व आरोग्य उपक्रम राबविणेबाबत केलेल्या सूचनांबाबत नियोजन करण्यास सांगितले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश

करण्यात येईल. मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत, सुधारित पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या सर्व लेखी सूचना हा सर्व दस्तावेज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या तर्फ पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेईल.

आयोजक यांनी परत उपस्थितांना काही सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. त्यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थित जनतेचे, शासकीय अधिकारी,कर्मचारी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी व कर्मचारी, पोलिस प्रशासन यांचे आभार मानले व पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठक संस्थगित करण्यात आली.

Digitally signed by
Parmeshwar Vishwambhar Naik
Date: 28-07-2026 13:18:18

**(प.वि.नाईक)**
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिति
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
लातूर

Digitally signed by
Manish Sopan Holkar
Date: 03-08-2026
19:02:49

**(मनिष होळकर)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

12.8.26

**(ओंकार बाळासाहेब देशमुख)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप जिल्हाधिकारी, धाराशिव,
जिल्हा - धाराशिव